महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९६ वा | दिनांक : २४/०९/२०२५ | वार : बुधवार


## राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई** : राज्यात यावर्षी सरसरीपेक्षा दुप्पट, तिप्पट पाऊस पडला आहे. 36 जिल्हे व 358 तालुक्यापैकी 30 जिल्हे व जवळपास 300 तालुके अतिवृष्टी आणि पूरग्रस्त आहेत. राज्यभरात जवळपास 143 लाख हेक्टरवरील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. पाऊस सातत्याने पडत असून शेतकरी हवालदिल झाला आहे. परंतु, राज्यातील महायुती सरकारला शेतकऱ्यांची चिंता नाही, पालकमंत्र्याने पाहणी सुद्धा केली नाही. मंत्रिमंडळात बैठकीत फक्त कोरडी चर्चा झाली. सरकारने झोपेतून जागे व्हावे व संकटातील शेतकऱ्याला हेक्टरी सरसकट 50 हजार रुपये तातडीने द्यावेत व शेतजमीन खरडून गेली त्यांना हेक्टरी 5 लाख रुपये द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथील पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर चौफेर हल्ला केला. ते पुढे म्हणाले की, मुसळधार पावसामुळे मराठवाडा, विदर्भातील काही जिल्हे, सोलापूर, अहिल्यानगर या जिल्ह्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. मराठवाड्यात तर अत्यंत वाईट परिस्थिती आहे. काँग्रेस पक्ष मागील दोन महिन्यापासून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी करत आहे, पण शेतकरी विरोधी महायुती सरकार मात्र पोकळ आश्वासने देत आहे. पावसाने हाहाकार माजवला आहे, शेतातील पिकं, जमीन, पुशधन, गृहपयोगी साहित्य सर्व वाहून गेले पण राज्यातील आंधळं, बहिरं व मुक्या सरकारला त्यांच्या वेदना दिसत नाही, मंत्र्यांना जिल्ह्यात जाऊन दौरे करा अशा सुचना मुख्यमंत्र्यांना कराव्या लागत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. निवडणुकीच्या प्रचारात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते त्याचे काय झाले असा सवाल सपकाळ यांनी विचारला आहे.

काँग्रेस सरकार असताना पिकाचे लाल्या रोग, बोंड आळीने नुकसान केले, गारपीट चक्रीवादळाने नुकसान केली की तातडीने मदत दिली जात पण भाजपा युतीचे सरकार मात्र नियम, अटी, शर्ती यातच अडकून पडले आहे. एवढे मोठे नुकसान झाले असताना पंचनामे कसले करता, आधी मदत द्या, मग कागदी सोपस्कार पूर्ण करा. सरकारचे मंत्री झोपले असताना काँग्रेसने समिती नेमून पूरग्रस्त भागाची पाहणी सुरु केली आहे. छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात खासदार डॉ. कल्याण काळे, माजी मंत्री अनिल पटेल, राजेंद्र राख, राजेश राठोड, लहु शेवाळे हे नुकसानीची पाहणी करणार आहेत. लातूर, बीड, व धाराशीव जिल्ह्यात खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, माजी मंत्री अशोक पाटील, दादासाहेब मुंडे, पांडुरंग कुंभार. नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात खासदार रविंद्र चव्हाण, माजी खा. तुकाराम रेंगे पाटील, आ.डॉ. प्रज्ञा सातव, बाळासाहेब देशमुख, प्रा. यशपाल भिंगे. अमरावती विभागात माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, आ. अमित झनक, आ. अनिल मांगूळकर, विरेंद्र जगताप, महेश गणगणे, प्रकाश तायडे..नागपूर विभागात खासदार नामदेव किरसान, खा. प्रशांत पडोळे, खा. शामकुमार बर्वे, सुरेश भोयर, रविंद्र दरेकर, संतोषसिंह रावत. उत्तर महाराष्ट्रात खासदार शोभा बच्छाव, खा. गोवाल पाडवी, राजाराम पानगव्हाणे, संदिप पाटील, आ. हेमंत ओगले, दरबारसिंग गिरासे यांचे पथक पाहणी करेल तर सोलापूर जिल्ह्यात खासदार प्रणिती शिंदे, माजी आ. प्रकाश यलगुलवार, रामहरी रुपनवर, अलका राठोड, विनोद भोसले हे नुकसानग्रस्त भागात जाऊन पाहणी करणार आहेत, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

## उद्यापासून नितीन गडकरींच्या कुकर्मांची मालिका

**मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उद्यापासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कुकर्मांची मालिका सुरू करण्याचा इशारा दिला आहे. अंजली दमानिया गत काही दिवसांपासून सातत्याने गडकरींच्या मुलाच्या कंपनीच्या नफेखोरीवरून त्यांच्यावर निशाणा साधत आहेत. त्यातच आता त्यांनी थेट गडकरींच्या कुकर्मांची मालिका जाहीर करण्याचा इशारा दिल्यामुळे राज्याच्या राज्यासह देशाच्या राजकारणात मोठी खळबळ माजण्याची चिन्हे आहेत.

अंजली दमानिया यांनी मंगळवारी सकाळी एका ट्विटद्वारे नितीन गडकरी यांचा मुलगा दिवसाकाठी तब्बल १४४ कोटी रुपयांनी श्रीमंत होत असल्याचा दावा केला होता. त्यांच्या ट्विटची राज्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली होती. तत्पूर्वी परवा त्यांनी आपण एका मोठ्या प्रोजेक्टवर काम करत असल्याचे सूतोवाच केले होते. त्यानुसार, त्यांनी उद्यापासून आपण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची पोलखोल मालिका सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. उद्या दुपारपासून मी नितीन गडकरी यांच्या विरुद्ध पोल खोल करायला सुरवात करणार आहे. त्यांच्या सगळ्या कुकर्मांची पूर्ण मालिकाच सुरू करणार आहे, असे त्या आपल्या ट्विटमध्ये म्हणाल्यात.

उल्लेखनीय बाब म्हणजे अंजली दमानिया यांचा दोन दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यासोबत सोशल मीडियावर वाद रंगला होता. त्यावेळीच त्यांनी आपण एका मोठ्या विषयावर काम करत असल्याचे संकेत दिले होते. सध्या मी एका खूप मोठ्या विषयावर काम करत आहे. त्यामुळे मी रोहित पवार व सुषमा अंधारे यांना विनंती करते की एक आठवडा थांबा. तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मी देईन. पण सध्या माझ्याकडे वेळ खरच खूप कमी आहे.

त्या असेही म्हणाल्या होत्या की, महाराष्ट्राच्या दोन विद्वान नेत्यांना माझे आदरपूर्वक उत्तर. माझ्या कृतींबद्दलच्या त्यांच्या समजुतींबद्दल, किंवा माझ्या हेतूंबद्दलच्या त्यांच्या गृहीतकांबद्दल, त्यांच्याशी वाद घालून उपयोग नाही. जे योग्य आहे ते करण्याचे प्रयत्न करावे आणि पुढे जावे. आणि हो, या दोन्ही नेत्यांनी कुठचाच विषय, ना कधी लावून धरला, ना कधी तडीस नेला, असे त्या या दोघांचाही चिमटा काढताना म्हणाल्या होत्या.

नितीन गडकरींनी काही दिवसांपूर्वीच माझ्या बुद्धीचे मूल्य प्रत्येक महिन्याला २०० कोटी रुपये इतके आहे, असे विधान केले होते. अंजली दमानिया यांनी त्यांच्या या विधानाचा दाखला देत आज म्हणाल्या होत्या की, गडकरी म्हणतात की, त्यांना पैशांची गरज नाही. त्यांच्याकडे पुरेसे पैसे आहेत. त्यांच्या मेंदूचे मूल्य दर महिन्याला २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. खरेतर त्यांनी स्वतःला खूप कमी लेखले आहे. कारण, गडकरींचे सुपुत्र दररोज १४४ कोटी रुपयांनी श्रीमंत होत आहेत.

आपल्याला माहिती आहे की, गडकरींच्या मुलाची सियान ॲग्रो नामक कंपनी आहे. २५ जून रोजी सियान ॲग्रोमध्ये १,८९,३८,१२१ प्रमोटर होल्डिंग शेअर्स होते. या शेअरच्या किंमतीत आज ७६ रुपयांची वाढ झाली. म्हणजेच एका दिवसात १४३.९२ कोटी रुपये त्यांनी कमावले. निखील व सारंग गडकरी दिवसाला इतके पैसे कमावत आहेत, असे दमानिया म्हणाल्या.

## राज्य सरकार कर्जमाफीच्या मुद्यावर गंभीर : एकनाथ शिंदे

**मुंबई** : अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह महाराष्ट्रातील सर्वच भागांत हाहाकार उडाल्याच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यंमत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य सरकार कर्जमाफीच्या मुद्यावर गंभीर असल्याचा पुनरुच्चार केला आहे. सरकार कर्जमाफीच्या मुद्यावर अत्यंत गंभीर आहे. यासंबंधी योग्यवेळी निर्णय घेतला जाईल. सरकार या प्रकरणी कोणत्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही, असे ते म्हणालेत.

राज्यात गत काही दिवसांपासून मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. त्यात शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकार कोणत्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नसल्याची ग्वाही दिली आहे. ते मंगळवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, सद्यस्थितीत शेतकरी संकटात आहे. त्यामुळे त्यांना तत्काळ मदत देण्यास आमचे प्राधान्य आहे. या प्रकरणी युद्धपातळीवर पंचनामे करून दिवाळीपूर्वी त्यांना मदत पोहोचती होईल याची काळजी घेतली जाईल.

राज्य सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या मुद्यावर अत्यंत गंभीर आहे. त्याचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल. तूर्त सरकार कोणत्याही परिस्थितीत आपल्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्याची ही वेळ आहे. त्यामुळे आम्ही सर्वजण शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री उद्या सोलापूरच्या व मी स्वतः धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाणार आहे. आमचे सर्व मंत्रीही आपापल्या जिल्ह्यांत जाऊन परिस्थितीचा आढावा घेतील. ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे, तिथे मदत केली जाईल. अतिवृष्टीग्रस्तांना जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याचाही प्रयत्न केला जात आहे, असे शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, मराठवाड्यात परिस्थिती गंभीर आहे. उत्तर महाराष्ट्र व विदर्भातही काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात ढगफुटी झाली. मंत्री शंभूराज देसाई यांनी आज पश्चिम महाराष्ट्रातील स्थितीचा उल्लेख केला. अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश्य स्थिती होती. ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेतपिकांच्या नुकसानीसह जमीनही खरडून गेली आहे. ओढ्याच्या व नाल्याच्या शेजारी असलेल्या गावांतील संपूर्ण माती वाहून गेली आहे. त्यामुळे तिथेही मोठे नुकसान झाले आहे.

पावसामुळे झालेल्या नुकसानीवर आज मंत्रिमंडळात चर्चा झाली. सरकारने या प्रकरणी युद्धपातळीवर पंचनामे करण्याचे आदेश दिलेत. काही ठिकाणी जीवितहानी झाली आहे. त्यांनाही सरकारच्यावतीने तत्काळ मदत दिली जाईल. काही ठिकाणी पाळीव प्राण्यांचीही हानी झाली आहे. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. कॅबिनेटमध्ये सर्वच प्रकारच्या नुकसानीवर गांभीर्याने चर्चा झाली. शासन म्हणून आम्ही शेतकऱ्यांच्या पाठिशी कायम उभे आहोत. कारण शेतकरी हा आपला अन्नदाता आहे. आमच्या मागच्या अडीच वर्षांच्या काळातही शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत किंबहुना त्यांच्यासाठी योजना राबवण्याचे काम केले होते, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५


# हिरवा गौताळा



हिरव्यागार गौताळ्याच्या
भिजल्या साऱ्या वाटा
दर्या खोऱ्यातून झरे
काढित होत्या वाटा
झुळझुळ मंजुळ वारे
आनंदाने लावीत होते नारे
रानावनामधी राना फुलासंगी
शब्द मैफल जमली होती
हिरव्यागार गौताळ्यासंगी
सृष्टी हिरवी नटली होती
इंद्रधनुष्याचे रंग
फुलात रंगले होते
कवितेला सूर लावीत
पक्षी गात होते
निळे निळे आभाळ ही
श्रोता झाला होता
वन्स मोर म्हणत
वारा कानात सांगत होता
कवितेचा शब्द न् शब्द
धबधबा स्वरबद्ध करत होता
चरणारी गायी वासरे
गळ्यावर गात होत्या
कवीच्या शब्द शब्दांनी
गौताळा फुलला होता
गौताळ्याच्या पानापानात
लेखणी भिजली होती
झरे झिरपीत काढित होत्या
खडकातून वाटा
हिरव्यागार गौताळ्याच्या
भिजल्या साऱ्या वाटा...


**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं :-8888606068**


# ढगफुटीसदृश्य पावसाने शेकडो एकरात बळीराजा कोलमडला!



**बुलढाणा (महेश मुंढे) :** सिंदखेडराजा तालुक्यात दिनांक २२ सप्टेंबर रोजी पहाटे तीन ते पाच या दरम्यान मुसळधार पावसाचा अक्षरशः कहर झाला. ढगफुटीसदृश्य झालेल्या या पावसामुळे बेलगंगा नदीच्या पात्राबाहेर दोन्ही बाजूला तब्बल चारशे फूटपर्यंत पाणी पसरले. गावोगाव पाणी शिरल्याने शेतकऱ्यांचे शेकडो एकरातील उभे पीक पाण्याखाली गेले.

शेती व जनावरांचे प्रचंड नुकसानया आपत्तीमुळे सोयाबीन, कपाशी, उडीद यासह खरीपातील बहुतेक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नुकतेच काढणीस आलेले सोयाबीन पूर्णपणे वाहून गेले, तर पक्व अवस्थेत असलेले कपाशी देखील पूर्णपणे जलमय झाले. एवढ्यावरच थांबता कामा नये, अनेक शेतकऱ्यांचे जनावरांसाठी बांधलेले गोठे शेतामध्ये पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले.

रात्रीच्या काळोखात हा पाऊस झाल्याने शेतकऱ्यांना जनावरे सोडविण्याचीही संधी मिळाली नाही. परिणामी अनेक जनावरांचा जीव गेला असून शेतकरी केवळ आर्थिकच नव्हे तर भावनिक धक्काही सहन करत आहेत.सोलर पॅनलचेही नुकसाननदीकाठच्या शेतात बसवण्यात आलेली सौरऊर्जेची पॅनेल्स हीसुद्धा या पुरात वाहून गेली. लाखो रुपयांची किंमत असलेली ही यंत्रणा जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान झाले आहे.

प्रशासनाचा दौरा आणि पंचनामेआपत्तीची माहिती मिळताच तहसीलदार साहेबांनी तात्काळ पूरग्रस्त गावांना भेट देऊन पाहणी केली. महसूल विभागाकडून पंचनामे सुरू असून जे शेतकरी हजर नव्हते त्यांचे पंचनामे महसूल सेवकांच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

आमदार मनोज कायंदे यांचा तत्पर प्रतिसादसंध्याकाळी आमदार मनोज भाऊ कायंदे यांनी स्वतः पूरग्रस्त गावांना भेट दिली. परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. त्यांनी प्रशासनातील महसूल, कृषी, पशुसंवर्धन आदी सर्व संबंधित विभागांना तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. गावकऱ्यांच्या दुःखात मी सदैव सोबत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांवर अस्मानी व भावनिक संकटया भीषण आपत्तीने शेतकरी हतबल झाला आहे. उभ्या पिकाचे नुकसान, जनावरांचे मृत्यू, सोर पॅनेल्ससह शेतमालाची झालेली हानी यामुळे बळीराजा कोलमडून गेला आहे. एकीकडे अस्मानी संकट तर दुसरीकडे झालेल्या नुकसानीमुळे मानसिक व भावनिक संकट या दोन्हींचा मोठा आघात शेतकऱ्यांवर झाला आहे.

गावकऱ्यांची अपेक्षागावकऱ्यांनी शासनाकडून तातडीने मदत मिळावी, नुकसान भरपाई लवकर द्यावी, तसेच शेतकऱ्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५


## बोगस हटाव आदिवासी बचाव सकल आदिवासी समाजाचे आंदोलन




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** नांदगाव तालुक्यातील सकल आदिवासी समाजाच्या वतीने दि २३ सप्टेंबर २०२५ रोजी "बोगस हटाव - आदिवासी बचाव" अशी पायी रॅली काढण्यात आली भारतीय राज्यघटनेतील कलम ३४२ हे अनुसूचित जमातीच्या संरक्षणासाठी तयार करण्यात आली आहे.

आदिवासी लोकं जंगलात आणि डोंगरात राहणारे आहेत जल जंगल आणि जमिनीचे खरे संरक्षक आहेत आदिवासी हा देशाचा मुळ रहिवासी आहे असे आंदोलनातील आदिवासी महिलांनी दाखवून दिले आदिवासी समाज हा आजही सामाजिक, शैक्षणिक आर्थिक मागासलेलाच आहे या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या1) बंजारा धनगर समाज व कोणत्याही समाजाला आदिवासी एसटी प्रवर्गात समाविष्ट करू नये 2)बंजारा व धनगर समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्याचे शिफारस पत्र देणाऱ्या आमदार खासदार यांच्यावर लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कारवाई करावी3) ST-B मध्ये कोणत्याही समाजाची वर्गीकरण करू नये या मागण्या जिल्हाधिकारी यांच्या मार्फत शासनाला कळविल्या जातील असे तहसिलदार सुनिल सौदाने यांनी सकल आदिवासी समाजाला आश्वासन दिले.

हैदराबाद गॅजेट नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत २ ऑक्टोंबर २०२५ रोजी राज्य शासनाने निर्णय निर्गमित केला आहे याच गॅझेटचा आधार घेऊन राज्यातील बंजारा धनगर समाज आता अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याची मागणी करू लागला आहे ही मागणी चुकीची असून असंवैधानिक व अन्यकारक आहे.

तरी आमच्या अनुसूचित जमाती (एसटी)मध्ये आरक्षणाबद्दल सरकारने काही चुकीचे निर्णय घेऊ नये हे आरक्षण आमच्या हक्काचे आहे त्यामध्ये कोणताही बदल करू नये तसेच बंजारा धनगर व इतर कोणत्याही समाजाला समाविष्ट करू नये खऱ्या आदिवासी असलेल्या समाजावर असे अन्याय करण्याचे प्रयत्न केल्यास सकल आदिवासी समाजाकडून राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल असा इशारा नांदगाव तालुक्यातील सकल आदिवासी बांधवांनी दिला आहे या आंदोलनात आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य नांदगाव शाखा एकलव्य संघटना आदीम सेना कातकरी संघटना तसेच आदिवासी महिला बांधव युवक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

## खामगाव गोरक्ष येथे शारदीय नवरात्रोत्सवास प्रारंभ



**फुलंब्री :** तालुक्यातील खामगाव नाथाचे येथे ग्रामदैवत गोरक्षनाथ महाराज मंदिरात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साह प्रारंभ झाला. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. दररोज संध्याकाळी 7 वा विधीवत पूजन करून, आरती, शिवमानस स्त्रोत, देवीची पदे भाविकांकडून सादर करण्यात येते. श्री अशोकराव भाले यांनी पौरोहित्य केले. नवरात्रोत्सवानिमित्त गोरक्षनाथ मंदिराला विद्युत रोषणाईने सजविण्यात आले.
दररोज रात्री भजनी मंडळ , स्थानिक कालावंताद्वारे भारुड, गोंधळ यांचे आयोजन करण्यात येते.
विजयदशमीच्या दिवशी आपट्याची पाने एकमेकांना 'सोनं' म्हणून देण्याची प्रथा आहे. यामुळे धन, ज्ञान आणि भक्तीची पूजा केली जाते आणि नाती अधिक दृढ होतात अशी भाविकांची श्रद्धा आहे.

## ध्येयासाठी सराव आणि सकारात्मक दृष्टिकोण महत्वाचा : शरद कुलकर्णी



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने प्राप्त अनुदानातंर्गत शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग व सर्वंकष निरामय स्वास्थ्य समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गिर्यारोहक श्री शरद कुलकर्णी यांचे "व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली"या विषयावर मार्गदर्शन व मुलाखत घेण्यात आली.

गिर्यारोहक श्री शरद कुलकर्णी यांनी व्यक्तिमत्व विकासाची गुरुकिल्ली याविषयवर मार्गदर्शन करताना २००५ मध्ये EBC ( Everest base camp ) Trek केला,त्याचवेळी एव्हरेस्ट सर करण्याचे बीज त्यांच्यामध्ये रोवले गेले असे त्यांनी प्रतिपादन केले. गिर्यारोहणातील अनेक थरार व रोमांचक अनुभव त्यांनी शेअर केले.

डॉ. रमा दुधमांडे मॅडम यांनी घेतलेल्या मुलाखतीतून गिर्यारोहण करताना तांत्रिक शिक्षण घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. असे त्यांनी आपल्या मुलखतीतून सांगितले. कुलकर्णी सर पुढे म्हणाले की कोणत्याही कामामध्ये संयम, शिस्त आणि सातत्य महत्त्वाचे असते. तसेच सराव आणि सरावच आणि सकारात्मक दृष्टिकोण महत्वपूर्ण असतो. हे त्यांनी आपल्या मुलखतीतून अधोरेखित केले. प्रत्येकाने स्वत:तील स्व: ला ओळखून प्रयत्न करायला पाहिजे तरच व्यक्ती आपले व्यक्तिमत्व घडवू शकते असे त्यांनी उपस्थितांना संबोधित करतांना सांगितले.

मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव मा. अ‍ॅड. श्री. नरेंद्र देशपांडे सर यांनी अध्यक्षीय समारोप करतांना म्हणाले की, कुठलेही कार्य करतांना संस्कार आणि मार्गदर्शक हा गुण अत्यंत महत्वपूर्ण असतो. आई-वडिलांचे संस्कार आणि आत्मनिर्भरता हे गुण असतील तर परिपूर्ण व्यक्तिमत्व घडते असे त्यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ . सुनिता बाजपाई यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनाक्षी निमकर यांनी केले तर आभार डॉ . मनीषा वाघमारे मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमात पर्यवेक्षिका प्रा . माधुरी भावसार मॅडम व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते . या कार्यक्रमात अनेक गिर्यारोहकांनी विशेष उपस्थिती नोंदविली.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५


# हे भगवंता

या फाटलेल्या नभाला दे एक टाका
जो करतोय विनाश मानवी जीवनाचा
नाही बघवत आता या हृदयाला
विनाश होताना शेती मातीचा

हृदय आकांताने जळते आता
लेकरासारख्या वाढणाऱ्या पिकाला
भिजताना पाण्यात बघून
असंख्य वेदना होता रे मनाला

होतं नव्हतं सर्वस्व टाकलं मातीत
मोठ्या आशेने पेरलं होतं शेतात
रौद्ररूप दाखवुनी पावसाने
अंधकार रे दाविला शेतकऱ्याच्या जीवनात

हिरवं सोनं कालपर्यंत डोलायचं जेथे
आज सर्वत्र तिथे चिखल दाटला,
घरं-जनावरं आणि स्वप्न वाहून गेली,
श्वासही दुःखात शेतकऱ्याचा अडकला.

हे भगवंता विनंती तुझं करतो कष्टकरी
स्वप्नांची होऊ देऊ नको राख-रांगोळी
देऊन आता विश्रांती मेघ देवा
जाऊ दे दोन घास सुखाचे रे मुखी

//काव्य रचना//


**संदिप नानासाहेब वाकडे**
रा.खेडा ता.कन्नड
जि. छत्रपती संभाजी नगर
मो. ९७६६९९२७७६


# श्री. विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात पाऊस चांगला झाल्याने कारखाना कार्यक्षेत्रात मुबलक प्रमाणात ऊस उपलब्ध आहे. त्यादृष्टीने हंगाम 2025-26 मध्ये 5.11 लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दीष्ट ठरवून परिपूर्ण तयारी आम्ही केलेली असून भागातील संपूर्ण ऊसाचे गाळप करणार आहोत. गळीत हंगाम 2025-26 चा बॉयलर प्रदिपन व गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रम पुढील आठवडयात होणार आहे.

तरी सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याची आग्रहाची विनंती आहे. अशी माहिती माजीमंत्री तथा कारखान्याचे चेअरमन मा. श्री. बसवराज पाटील यांनी सभेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना दिली.पुढे बोलताना चेअरमन पाटील म्हणाले की, कारखाना आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचे ऊसास जास्तीचा भाव देणे यासाठी साखर उत्पादनाबरोबरच उपपदार्थ निर्मिती करणे गरजेचे आहे. त्यानुसार कारखाना साईटवर 60 केएलपीडी क्षमतेचा डिस्टीलरी प्रकल्प उभारणी करण्यास मंजुरी मिळालेली आहे. जवळपास डिस्टीलरी उभारणीसाठी सर्व औपचारीकता पूर्ण झाल्या असून प्रकल्प अहवालानुसार रक्कम रू.100 कोटी किंमतीच्या डिस्टीलरीचे काम लवकरच सुरु होणार आहे.

या कामासाठी मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी मंत्री महोदयांचे आभार चेअरमन पाटील यांनी मानले.सदर सभेत सर्व उपस्थित सभासदांनी विषय पत्रिकेवरील विषयांना टाळयांच्या गजरात मंजुरी दिली. विषय पत्रिकाचे वाचन प्र. कार्यकारी संचालक मा.श्री. एस. आर. गवसाणे यांनी केले. सदर कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन सादिकमियाँ काझी, धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन मा.श्री.बापुराव पाटील, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन मा. श्री. शरण पाटील संचालक सर्वश्री ॲड. सुभाष राजोळे, केशवराव पवार, रामकृष्णपंत खरोसेकर, शब्बीर जमादार, दिलीपराव पाटील, संगमेश्वर घाळे, शरणप्पा पत्रिके, राजीव हेबळे, माणिकराव राठोड, दत्तू भालेराव, श्रीमती मंगलताई गरड, सौ. इरम्माताई स्वामी, शिवलिंग माळी, ॲड. संजय बिराजदार तसेच प्रकाश आष्टे, बलभिमराव पाटील, मा.प्रा. दिलीप गरुड, प्राचार्य राम सोलंकर, प्राचार्य श्रीराम पेठकर, दिपक मुळे, हरि लोखंडे, शिवशंकर जट्टे, रशिद शेख आदी मान्यवर कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमास सभासद मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक एस. आर. गवसाणे यांनी केले. आभार प्रदर्शन संचालक विठ्ठलराव बदोले यांनी केले. सुत्रसंचालन केन अकौंटंट राजु पाटील यानी केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५


## भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर राज्यस्तरीय पीपीटी स्पर्धा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर** : देवगिरी महाविद्यालय, मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीचे डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय आणि शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय यांच्यातर्फे शैक्षणिक सामंजस्य करारांतर्गत संस्कृत विभागातर्फे मंगळवारी (ता. 23) सकाळी साडेनऊला 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर राज्यस्तरीय पीपीटी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मार्गदर्शक व प्रमुख वक्ता म्हणून सुप्रसिद्ध संस्कृत अभ्यासक मा. श्री. निलेश नीलकंठ ओक, देवगिरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला कला महाविद्यालयाच्या प्राचार्य सुनिता बाजपाई, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवल थोरात, विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. पंकजा वाघमारे, महिला महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग प्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार व देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा. वर्षा तुळापूरकर उपस्थित होत्या.

एकूण ४१ विद्यार्थ्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेतील विविध विषयांवर पीपीटी सादर केल्यात. दुपारच्या सत्रात माननीय श्री. निलेश ओक सरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी केले.

तर आभार प्रगटन प्रा. वर्षा तुळापूरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांक सृष्टी फुलारे , द्वितीय क्रमांक चंचल बेदवे, तृतीय क्रमांक साधना शिंदे, उत्तेजनार्थ क्रमांक मंजिरी जगधने , मंगल ताठे यांना प्राप्त झाला.

## श्रीकृष्ण महाविद्यालयाचा आविष्कार, संशोधक विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद





**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात नुकताच आविष्कार स्पर्धा 2025 चा उद्घाटन सोहळा महाविद्यालयाच्या सभागृहात अत्यंत दिमाखात पार पडला. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून लाभलेले डॉ.राजीव मराठे, विद्यापीठ समन्वयक डॉ.भास्कर साठे ,युनिक व आविष्कारचे संचालक डॉ.प्रवीण यन्नावार ,विद्यापीठ समन्वयक डॉ.प्रभाकर उंदरे,डॉ.ओमप्रकाश जाधव,डॉ.नितीन पडवळ , श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे संचालक डॉ.सागर पतंगे यांच्या उपस्थितीत प्रारंभी दीपप्रज्वलन व श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना आविष्कार कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.राजीव मराठे यांनी सांगितले की प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थ्यांना नव्या नव्या संधी उपलब्ध आहेत.

एकही क्षेत्र नाही जे शेतीशी निगडित नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला आणि कल्पक मांडणीला पुरेसा वाव आहे. अँडव्हान्स टेक्नॉलॉजी आलेली आहे.त्याचा अभ्यास आपण केला पाहिजे.भारतीय कृषिक्षेत्रात क्रांतिकारक बदल घडविण्याची ताकत तुमच्यात आहे याची जाणीव ठेवण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

विद्यापीठ समन्वयक डॉ.भास्कर साठे यांनी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग बघून अक्षरशः भारावून गेले ,विद्यार्थ्यांचा ओसंडून वाहणारा उत्साह आणि चैतन्य पाहून सर्वच वातावरण चैतन्यमय झाले होते जवळपास दोनशे वीस विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले.विविध विषय आणि विद्यार्थ्यांची कमालीची उत्सुकता आणि कौशल्य यावेळी पहावयास मिळाले.खरे तर धाराशिव जिल्ह्यात पावसाने थैमान घातलेले असतानाही सर्वांनी आविष्कार 2025 ला भरभरून प्रतिसाद दिला आणि श्रीकृष्ण महाविद्यालयाचे कार्यक्रमाचे अत्यंत नेटके आयोजन केले.त्यामुळे डॉ.भास्कर साठे यांनी विद्यार्थी, संस्था, महाविद्यालय आणि प्राचार्य या सर्वांचे कौतुक करत गुंजोटी सारख्या ग्रामीण भागात आपण एवढे देखणे आणि सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करू शकतो हा एक सर्वासमोर घालून दिलेला आदर्श आहे.असे उद्गार काढले.याप्रसंगी सर्वच पाहुण्यांनी महाविद्यालयाचे व विद्यार्थ्यांचे कौतुक करत म्हणाले की,सर्वत्र पाऊस आहे. जनजीवन विस्कळीत झालेले आहे तरीही अशा प्रतिकूल परिस्थितीत विद्यार्थ्यांचा एवढा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळणे ही साधी गोष्ट नाही.

विद्यार्थ्यांच्या कला, गुणांना वाव मिळावा त्यांच्या कल्पनांना संशोधनाचे नवे पंख मिळावेत. त्या. संशोधक पंखांना बळ देण्यासाठी या नव्या उपक्रमाची सुरुवात केली आहे. यापुढे तालुका पातळीवर सुद्धा अशा नवोपक्रम व संशोधन स्पर्धा घेण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. कारण संशोधन तळातून आले पाहिजे. यापुढेही आपला असाच प्रतिसाद मिळावा असे सांगून त्यांनी महाविद्यालय व प्राचार्यांचे विशेष आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी अध्यक्षीय समारोप केला.अध्यक्ष पदावरून बोलताना त्यांनी या आविष्कार स्पर्धेचा उल्लेख विद्यार्थ्यांच्या कल्पना व कल्पकतेचा मेळावा असा करून धैर्य,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यशश्री कशी खेचून अनंत येते हे उदाहरणासह स्पष्ट केले.आपल्या संशोधनाचा उपयोग समाजहितासाठी उपयुक्त ठरला पाहिजे हेही आवर्जून सांगितले.यावेळी त्यांचा अध्यक्षीय समारोपही अतिशय भारावून गेलेला होता.

शेवटी समारोपाच्या समारंभात जवळपास 25 विद्यार्थ्यांना केंद्रीय आविष्कार स्पर्धेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम,द्वितीय ,तृतीय आणि उत्तेजनार्थ असे पात्र झाल्याचे प्रमाणपत्र पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आणि भावी स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.प्रातिनिधिक स्वरूपात परीक्षकांनी आपला अभिप्राय व्यक्त केला.सहभागी स्पर्धकांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट आणि सुंदर असे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ. आसिया चिश्ती यांनी केले.पाहुण्यांचा परिचय अनुक्रमे डॉ.योगीराज विजापुरे,व डॉ.रामकृष्ण कदम यांनी करून दिला. तर कार्यक्रमाचे सर्वकष आभार डॉ. मल्लमा आंबुसे यांनी मानले व सर्वांची मने जिकली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अपार मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी करून दाखवला.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५


## जि. प. कें. प्रा. शाळा ढोरेगाव येथे अबॅकस किट व पुस्तक वाटप




**गंगापुर (मकसूद खान) :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ढोरेगाव येथे इयत्ता दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी गीताबन लासुर स्टेशन यांच्या वतीने पुरविण्यात आलेल्या अबॅकस किट व पुस्तक वाटप कार्यक्रम शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलील पटेल यांच्या हस्ते मंगळवार २३ रोजी सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी अशोक कांबळे,लतीफ शेख, मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे आदी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा गणित विषयावरील आत्मविश्वास वाढून संख्याज्ञान अधिक प्रभावी होणार असल्याचे प्रतिपादन उपस्थितांनी केले.पालकांनीही या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाळा प्रशासन करत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे,पदवीधर शिक्षक राजेश हिवाळे,राजश्री वानखडे,शंकर राऊत,बसवराज उदे,रीना लोहार,भारती भोये,वंदना निधोनकर,नीलिमा कुलकर्णी,मुग्धा निमसे, मनोज मस्के, सचिन पाटसकर,शामीर शेख,अली बाकोदा,आश्विनी कांबळे, अबॅकस शिक्षिका कल्याणी जगताप यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत हा उपक्रम योग्य पद्धतीने राबविण्यासाठी पुढाकार घेतला.

## कृष्णा इंटरनॅशनल स्कूल वॉलीबॉल मध्ये दुहेरी मुकुट कन्नड तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (कृष्णा शिंदे) :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर आणि कृष्णा इंटरनॅशनल स्कुल कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा थाटामाटात पार पडल्या.

स्पर्धेचे बक्षीस वितरण प्रसंगी छत्रपती संभाजीनगर व्हॉलीबॉल संघटनेचे सदस्य व मार्गदर्शक प्रविण शिंदे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना म्हटले की संघटनेचे पण अनेक स्पर्धा असतात तुम्ही यामध्ये सहभाग घ्यावे यावेळी मुक्तानंद गोस्वामी तालुका क्रीडा संयोजक यांनी शासनाच्या विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन आपलं कौशल्य प्राप्त करावे .

कृष्णा इंटरनॅशनल स्कुलचे अध्यक्ष सचिन पवार उपस्थित होते त्यांनी खेळ आणि खेळाचे महत्व विषद केले, प्रविण शिंदे यांनी ग्रामीण भागातील खेळाडूसाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे म्हटले, संयोजक मुक्तानंद गोस्वामी यांनी आतापर्यंत सर्व खेळाच्या स्पर्धा पारदर्शक व नियमानुसारच खेळवल्याचे सांगितले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे आहे . . १४ वर्षे मुले - प्रथम - कृष्णा इंटरनॅशनल स्कुल कन्नड, द्वितीय - साने गुरुजी विद्यालय कन्नड . . १४ वर्षे मुली प्रथम - कृष्णा इंटरनॅशनल स्कुल कन्नड. द्वितीय - गौताळा व्हॅली स्कुल कन्नड १७ वर्षे मुले - प्रथम - अलि अलाना माध्यमिक विद्यालय कुंजखेडा , द्वितीय - फातेमा कॉन्हेंट हायस्कुल कन्नड - १७ वर्षे मुली - प्रथम - साने गुरुजी विद्यालय कन्नड , द्वितीय - श्री गणेश विद्यालय देवगांव ( रं ) १९ वर्षे मुले - प्रथम - श्री गणेश विद्यालय देवगांव ( रं ), द्वितीय - अली अलाना माध्यमिक विद्यालय कुंजखेडा , १९ वर्षे मुली - प्रथम - मदरगंगा इंग्लीश स्कुल कन्नड द्वितीय - संघ नाही या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे,राकेश निकम, करण राठोड, रविकुमार सोनकांबळे, कडुबा चव्हाण, राहुल दणके, मुख्य पंच म्हणून विशाल दांडेकर, एजाज शहा यांनी विशेष परिश्रम घेतले .

# मराठा म्हणुन काय देणार याचा शासनाने उल्लेखच केला नाही ? न्याय देण्याचा रोड मॅपच नाही ?




राज्यातील आरक्षण विषयाने आता जोर धरला असुन मराठवाड्यातील नोंद उपलब्ध असलेल्या व्यक्तींनी विहित पद्धतीचा शासकीय अवलंब केल्यास कुणबी जात प्रमाणपत्र मिळणारच आहे परंतु ज्यांच्या कडे काही एक पुरावा नाही त्या सर्व " मराठा " बांधवांचे काय ?या प्रश्नाची सोडवणुक करण्यासाठी अभ्यासकांची गोलमेज परिषद छत्रपती संभाजीनगर येथे 18 सप्टेंबर येथे पार पडली आणि सर्वच सत्य समोर आले.सर्वच राजकीय पक्षांनी सांगितलं होतं की, आम्ही कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देणार आणि तीच भाषा आता राज्य शासन बोलत आहे.आणि त्यानुसार सर्वपक्षीय सरकारने मराठा समाजाला ई.एस.बी.सी आरक्षण दिलं होतं आणि ते अजून टिकून आहे. नोंदी शोधण्याचे कार्य सुरू झाले आणि नोंदी शोधून, ज्यांच्या नोंदी सापडतील त्यांना कुणबी जात प्रमाणपत्र द्यायला कोणीही रोखू शकत नाही.पण ज्यांच्या नोंदी लांबपर्यंत नाहीत व सापडणार नाहीत त्यांचे काय किंवा आणि सापडणार देखील नाहीत,त्यांचा आरक्षणाचा प्रश्न तसाही प्रलंबित राहणार होता. त्यांचाही आरक्षणाचा प्रश्न सोडवणे गरजेचं होतं. त्यानुसार सर्वपक्षीय सरकारने एस.ई.बी.सी आरक्षण दिलेलं आहे. त्या दिलेल्या आरक्षणा विरुद्ध अनेकांनी कोर्टात याचिका दाखल केल्या आहेत व होत्या आणि आहेत त्यात याच जेष्ठ अभ्यासका शिवाय कोणीही हस्तक्षेप याचिका दाखल केलेल्या नाहीत हे कटु सत्य समाजाने स्वीकारले पाहिजे. मराठा आरक्षणा विरुद्ध याचिका कर्त्यांचे समान असे एकच मत आहे आणि होतं की,मराठा समाज सामाजीक शैक्षणिक मागास नाही व इंद्रा सहानी नुसार 50 % च्या पुढच आरक्षण देता येत नाही. यावरती एकच पर्याय होता तो म्हणजे घटना दुरुस्ती केंद्राने करणे व तशी केंद्रातून आरक्षणाची मर्यादा वाढवून घेणे. या साठी सुद्धा मराठा समाजातील ती महनीय अभ्यासु व्यक्ती सतत सतत कार्यरत आहे.

मराठा आरक्षणासाठी मोर्चे निघत असताना लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान राहुल गांधी,शरद पवार,आणि उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट सांगितलं होतं की केंद्रातून आरक्षणाची मर्यादा वाढवण्याच्या ठरावाला आम्ही पाठिंबा देऊ वनवास यात्रा, उपोषण, शक्ती प्रदर्शन,महाआंदोलन सर्व काही झाले तरीही सरसकट सर्व मराठा आरक्षणा चा प्रश्न सुटला नाही.यामध्ये लोकसभा राज्यसभा निवडणुका झाल्या आता काही दिवसात महानगर पालिका स्वराज्य संस्थेच्या निवडणुकाही होतील. मग पुढे काय ?अनेकांचे नोकरीत आणि शिक्षणात नुकसान झाले, अनेकांनी आत्महत्या केल्या. याला जबाबदार कोण ? घटनात्मक व कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता आरक्षण मागणे असे का होते ?....म्हणुन ज्यांच्या नोंदी सापडल्या व सापडत आहे त्यांना ओबीसी जात प्रमाणपत्र मिळेलच पण ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत,काही एक पुरावा नाही त्यांच्या आरक्षणाचे काय ? अर्धवट अपूर्ण लाईव्ह व्हिडिओ ज्यांनी शंकर आयोग,खत्री आयोग, बापट आयोग,सराफ आयोग,अगदी गायकवाड आयोग,शुक्रे आयोग यांचे समक्ष सुनावणी केली त्यांचे नाव जाणुन बुजुन समाजा पासुन लपवुन ठेवल्या जात आहे ते याच अर्धवट लाईव्ह करणाऱ्या कडून हे सतत होत आहे. हे ज्यांची नावे घेतात त्या पैकी फक्त दोनच व्यक्ती उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालय इथ पर्यंत लढा देत आहे.

त्या दोन महनीय व्यक्ती पैकी एकच पठ्ठा असा आहे की,त्यांनी प्रत्यक्ष एन सी बी सी आयोग दिल्ली,सर्वोच्च न्यायालयातील न्यायमुर्ती रोहिणी आयोग दिल्ली यांना भेटुन निवेदन सादर करून जो पर्यंत " मराठा आरक्षण " हा विषय अंतिम होत नाही तो पर्यंत आपला रिपोर्ट थांबवावा असे अर्ज दिले आहेत तसेच एक अशा महनीय व्यक्तीचे जी की सतत नागपुर हायकोर्ट छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद )हायकोर्ट मुंबई हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट मध्ये सध्याही लढा देत आहेत त्यांचे नावं यांच्या अर्धवट लाईव्ह प्रोग्राम मध्ये का घेतले जात नाही ? का त्यांना डावलले जाते ? हा भेद भाव का केल्या जातो ? सांगायचीच तर सर्वच सत्यता का सांगत नाही ? या " अर्धवट लाईव्हकार " करणारे पैकी कोणी उत्तर देतील काय ? किंवा यांना असे तर वाटत नाही की,कोंबडे झाकले म्हणजे ते आरवणार नाही ? असा समज साधारणता सर्व दुर पसरला आहे म्हणूनच उत्तर अपेक्षित आहे आणि हीच अपेक्षित मागणी आहे.काय म्हणाले ना.छगन भुजबळ हैदराबाद गॅझेटवरील याचिका फेटाळल्यानंतर छगन भुजबळ यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. 'आम्ही सुरुवाती पासूनच सांगत होतो की, जनहित याचिका न करता रिट याचिका दाखल करा.

आतापर्यंत आम्ही चार-पाच रिट याचिका दाखल केल्या आहेत,' असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.असे काही होणारच आहे असे अभ्यासपूर्ण निरीक्षण करून मराठा समाजाच्या एक अभ्यासु नेत्याने 11 सप्टेंबर पूर्वीच सर्वोच्च न्यायालय, नागपुर हायकोर्ट, छत्रपती संभाजीनगर हायकोर्ट, मुंबई हायकोर्ट आदी ठिकाणी आमचे म्हणणे ऐकल्या शिवाय काही एक निर्णय घेणे किंवा 02 सप्टेंबर च्या जी आर ला स्थगिती देऊ नये अशी सविस्तर कॅव्हेट याचिका दाखल करून ठेवली असल्यामुळे मुख्य धोका टळलेला आहे.त्या अभ्यासु व दुर दृष्टी असलेल्या नेत्याचे मात्र राज्य भर कौतुक होत असुन अशाच प्रसिद्धीच्या मागे नसलेल्या नि:स्वार्थ अभ्यासु व्यक्तींची गरज मराठा समाजाला असुन या महनीय व्यक्तीचा लवकरच ठीक ठिकाणी मराठा समाजा च्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे.


**राजेंद्र दाते पाटील**

**अभ्यासक मराठा आरक्षण**

**मो. +९१ ९७६७४ ०१६६५**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५

# सत्यशोधक समाज : सामाजिक समता, न्याय आणि मानवतेची क्रांती

24 सप्टेंबर 1873 रोजी, महात्मा जोतिबा फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा केवळ एका संस्थेच्या स्थापनेचा दिन नाही, तर तो सामाजिक समता, बंधुत्व, न्याय, आणि मानवतेच्या मूल्यांचा प्रत्यक्ष प्रसार करणारा प्रवाह आहे. 24 सप्टेंबर रोजी साजरा होणारा 'सत्यशोधक समाज वर्धापन दिन' हा दिवस त्या संस्थेच्या सामाजिक कार्याची, विचारसरणीची आणि मानवाधिकारांच्या संरक्षणाच्या भूमिकेची आठवण करून देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, सत्यशोधक समाज हा भारतीय समाजातील जातीय, धार्मिक, आर्थिक आणि लिंगभेदाच्या विरोधात सतत लढणाऱ्या संघटनांमध्ये अग्रगण्य ठरतो. त्याच्या स्थापनेपासून आजपर्यंत, या समाजाने महाराष्ट्रातील तसेच भारतातील कमजोर असलेल्या, पिछडलेल्या आणि शोषित गटांवर होणाऱ्या अन्यायावर लक्ष केंद्रीत केले आहे. सत्यशोधक समाजाने जातीय व धार्मिक भेदभावाचा निषेध केला, समाजातील असमानतेवर प्रश्न उपस्थित केला, तसेच सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्यांची जोपासना केली. या संस्थेने समाजातील प्रत्येक घटकाला सामाजिक बदलासाठी सहभागी होण्याची प्रेरणा दिली, आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, समाजातील सामाजिक गतिशीलता व बंधुत्वाची भावना वाढवली.

सत्यशोधक समाजाची स्थापना त्या काळातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितींचा परिणाम मानता येईल. 1873 च्या भारतात समाजातील विविध गटांमध्ये असमानता, शोषण, जातीभेद, महिला व बालकांविरुद्ध अन्याय, गरीब व कामगार वर्गांचे हक्कांचे उल्लंघन या समस्या प्रचंड पातळीवर होत्या. त्या परिस्थितीत सत्यशोधक समाजाचा जन्म हा केवळ सामाजिक चळवळीचा भाग नव्हता, तर मानवाधिकार, समानता आणि बंधुत्व या मूल्यांच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्णायक टप्पा ठरला. महात्मा फुले यांनी या संस्थेच्या माध्यमातून शोषित गटांना न्याय मिळवून देण्याचे आणि समाजातील अन्यायपूर्ण व्यवस्थांवर प्रश्न उपस्थित करण्याचे उद्दिष्ट ठेवले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, हे आंदोलन समाजातील असमानता कमी करण्याचे, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे आणि सर्वसमावेशक विकास साधण्याचे माध्यम ठरले. सत्यशोधक समाजाने लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली, शोषणाविरोधात आवाज उठवण्यास प्रोत्साहित केले, आणि सामाजिक बदलासाठी ठोस उपक्रम राबवले.

सत्यशोधक समाजाच्या कार्यप्रणालीमध्ये शिक्षणाला अत्यंत महत्व दिले गेले आहे. शिक्षण हे केवळ विद्या प्राप्तीचे साधन नाही, तर सामाजिक समता, बोधशक्ती, आत्मनिर्भरता आणि व्यक्तिमत्व विकासाचे मुख्य आधार आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील शोषित आणि पिछडलेल्या गटांसाठी सत्यशोधक समाजाने शालेय शिक्षण, बालविकास, महिला शिक्षण आणि सामाजिक साक्षरता या क्षेत्रात कार्य केले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, शिक्षणामुळे समाजातील व्यक्तींमध्ये निर्णयक्षमता, आत्मसन्मान, सामाजिक सहभाग आणि न्यायबुद्धी विकसित होते. शाळा, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि सार्वजनिक व्याख्याने या माध्यमातून लोकांमध्ये ज्ञान, संवेदनशीलता आणि सामाजिक बोध निर्माण करणे हा सत्यशोधक समाजाचा ठळक उद्देश राहिला. या उपक्रमांमुळे ग्रामीण समाजातील महिला, बालके आणि वंचित वर्गांचे सामाजिक स्थान सुधारले आणि समाजातील असमानतेवर मात करण्याची दिशा स्पष्ट झाली.

महिला सक्षमीकरण हे सत्यशोधक समाजाच्या कार्यातील अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्टीने सक्षम करणे, ज्यामुळे लिंगभेद आणि सामाजिक असमानतेला प्रत्यक्ष उत्तर मिळते. सत्यशोधक समाजाने महिलांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, आरोग्य व पोषणाबाबत जागरूकता निर्माण केली, स्वरोजगार व कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवले, आणि समाजातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग सुनिश्चित केला. ग्रामीण भागातील महिलांना बालविवाह, कुटुंब नियोजन, आरोग्य, पोषण आणि सामाजिक हक्कांबाबत मार्गदर्शन केले गेले. या उपक्रमांमुळे महिलांचे आत्मविश्वास वाढला, समाजातील लिंगभेद कमी झाला आणि सर्वसमावेशक सामाजिक विकास साधला गेला. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, या कार्यामुळे समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान सुधारले, महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाचा प्रसार झाला आणि समाजातील सामाजिक बंधुत्व दृढ झाले.

सत्यशोधक समाजाचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे सामाजिक चेतना निर्माण करणे. समाजशास्त्राच्या दृष्टीने, सामाजिक चेतना म्हणजे व्यक्तींना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, शोषण व अन्याय ओळखण्यास प्रवृत्त करणे, आणि सामाजिक बदलासाठी आवश्यक असलेल्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे. सत्यशोधक समाजाने सार्वजनिक सभा, कार्यशाळा, माध्यमांचा उपयोग करून लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली. लोकांनी जातीय, धार्मिक, आर्थिक आणि लिंगभेदांविरुद्ध आवाज उठवणे, न्यायाच्या मागणीसाठी एकत्र येणे, आणि सामाजिक सुधारणा साध्य करण्याचे महत्त्व समजून घेतले. या प्रक्रियेत समाजातील प्रत्येक घटक सक्रिय सहभागी झाला, आणि सामाजिक बदलाचे स्थायी परिणाम सुनिश्चित झाले. ग्रामीण आणि शहरी भागातील लोकशिक्षण, आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांमध्ये सत्यशोधक समाजाच्या उपक्रमांनी सामाजिक गतिशीलता वाढवली आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण केली.

सत्यशोधक समाजाचे कार्य केवळ शिक्षण आणि महिला सक्षमीकरणापुरते मर्यादित नाही, तर सामाजिक न्याय, आर्थिक समता, आरोग्य आणि पोषण यावर देखील प्रभावी परिणाम साधते. ग्रामीण भागातील गरीब, आदिवासी, दलित आणि अन्य पिछडलेल्या गटांसाठी रोजगारनिर्मितीचे कार्यक्रम, आरोग्य सुविधा, पोषण अभियान आणि बालविकासाचे उपक्रम राबविले गेले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, या उपक्रमांमुळे समाजातील दुर्बल घटक सशक्त होण्यास मदत झाली, सामाजिक विषमता कमी झाली, आणि समाज अधिक न्यायपूर्ण व समतोल बनला. सत्यशोधक समाजाने समाजातील विविध गटांमध्ये बंधुत्व, सहकार्य आणि सहिष्णुतेची भावना रुजवली, ज्यामुळे सामाजिक संघर्ष कमी होतो आणि समानतेच्या मूल्यांचा प्रसार होतो. या उपक्रमांमुळे समाजातील प्रत्येक घटक समाजात सक्रियपणे सहभाग घेऊ लागतो आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेत योगदान देतो.

सत्यशोधक समाजाच्या सामाजिक कार्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बालविकास व शिक्षण क्षेत्रातील योगदान होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, बालविकास हे समाजाच्या भावी पिढीच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक स्वास्थ्याचे मूलभूत अंग आहे. सत्यशोधक समाजाने ग्रामीण भागातील बालकांसाठी शालेय शिक्षण, पोषण, आरोग्य आणि सामाजिक साक्षरतेवर विशेष लक्ष दिले. यामुळे बालकांचा सर्वांगीण विकास साधला जातो, आत्मविश्वास वाढतो आणि समाजातील शोषण व असमानतेविरुद्ध सजगता निर्माण होते. बालकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे, शालेय वातावरणातून सामाजिक मूल्यांची शिकवण देणे, आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे हे सत्यशोधक समाजाचे ठळक योगदान आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, यामुळे समाजाची सामाजिक कार्यक्षमता वाढते, पुढील पिढीसाठी समतेची संस्कृती रुजते आणि सामाजिक बदल टिकाऊ बनतो.

सत्यशोधक समाजाच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे आरोग्य आणि पोषण क्षेत्रातील योगदान होय. ग्रामीण भागातील गरीब, आदिवासी आणि पिछडलेल्या समुदायांसाठी आरोग्य सुविधा, पोषण कार्यक्रम, कुटुंब नियोजन आणि बालकांच्या पोषणाची काळजी या बाबींवर या संघटनेने विशेष लक्ष दिले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आरोग्य व पोषणामुळे समाजातील दुर्बल घटक सशक्त होतात, सामाजिक समता वाढते आणि सामाजिक विषमता कमी होते. आरोग्य आणि पोषण हे केवळ शारीरिक स्वास्थ्यापुरते मर्यादित नाही, तर ते सामाजिक न्याय व समानतेचे मूलभूत घटक बनतात. या उपक्रमांमुळे समाजात जागरूकता, सामाजिक सहभाग आणि समता साधली जाते.

सत्यशोधक समाजाच्या सामाजिक कार्याचे महत्त्व हे स्पष्टपणे दिसून येते की, या संस्थेने समाजातील दुर्बल घटकांना सशक्त केले, सामाजिक जागरूकता वाढवली, आणि न्याय, समानता व बंधुत्व यांच्या मूल्यांची जोपासना केली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, सत्यशोधक समाजाने समाजातील आर्थिक, लिंगीय, जातीय आणि धार्मिक विषमतांविरोधी आंदोलन राबवले, सामाजिक सुधारणा साधल्या, आणि सामाजिक चेतना निर्माण केली. या उपक्रमांमुळे ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोक सामाजिक बदलात सक्रिय सहभागी होऊ लागले. सत्यशोधक समाजाच्या उपक्रमांमुळे समाजातील व्यक्तींमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, बंधुत्वाची जाणीव आणि सामाजिक जबाबदारी वाढली.

24 सप्टेंबर रोजी साजरा होणारा वर्धापन दिन हा केवळ संस्थेच्या स्थापनेचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय, समानता, बंधुत्व, सामाजिक चेतना आणि लोकशाही मूल्यांच्या आचारसंहितेचे पालन करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्याने दाखवून दिले आहे की समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेले सामाजिक उपक्रम फक्त तात्पुरते बदल घडवून आणत नाहीत, तर दीर्घकालीन, टिकाऊ आणि सर्वसमावेशक सामाजिक बदल साधतात. या संघटनेच्या कार्याने महाराष्ट्रात आणि भारतीय समाजात सामाजिक सुधारणा, समानता, महिला सक्षमीकरण, बालविकास, शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक चेतना या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सत्यशोधक समाज हा समाजातील प्रत्येक घटकासाठी मार्गदर्शक ठरतो, ज्यामुळे प्रत्येक नागरिक समाजातील बदलासाठी सहभागी होतो आणि सामाजिक न्याय व समतेच्या मूल्यांची जोपासना करतो. सत्यशोधक समाजाचा संदेश हे फक्त ऐतिहासिक दस्तऐवज नाही, तर तो सामाजिक बदल, बंधुत्व, न्याय आणि समतेचा स्थायी आदर्श आहे. या संघटनेच्या उपक्रमांनी समाजातील असमानता कमी करण्यास, सामाजिक समता वाढवण्यास, आणि प्रत्येक व्यक्तीला त्याचे अधिकार समजून घेण्यास मदत केली. या उपक्रमांमुळे समाज अधिक न्यायपूर्ण, समतोल, जागरूक आणि सहिष्णू बनला आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्याने हे सिद्ध केले आहे की सामाजिक सुधारणा आणि समानतेसाठी केलेले प्रयत्न केवळ संस्था किंवा व्यक्तीपुरते मर्यादित नसून, समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात, निर्णय प्रक्रियेत, आणि सामाजिक संबंधांमध्ये दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवू शकतात.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582,**
**ईमेल –**
bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ सप्टेंबर २०२५

# बाप : आठवणीचा जिवंत श्वास

## मरहूम शेख ताजुद्दीन महेबूब यांच्या 19 व्या पुण्यस्मरणानिमित्त लेख..

बाप हा फक्त कुटुंबाचा प्रमुख नसतो, तो म्हणजे घराचा श्वास असतो. तो असतो तोपर्यंत लेकरं निर्धास्त असतात. पण जेव्हा तो जगाला निरोप देतो, तेव्हा अचानक जाणवतं की आयुष्याची छाया, आसरा, आडोसा हरवला आहे. तरीही बाप कधीच संपत नाही—तो आपल्या मुलांच्या आठवणींतून, त्यांच्या श्वासात, त्यांच्या कृतीत कायम जिवंत राहतो.बाबांचे संघर्षमय जीवन कित्येक वाळवंट तुडवीत आलेले असेल हे सांगण कठीण आहे. बाबांचं जगण्यातील तत्वज्ञान फार वेगळं होतं, कारण त्याला इस्लामिक ठेवण होती. गरजूंना मदत करणे ही मोहम्मद सलल्लाहू वालैहूसल्लम पैगंबराची शिकवणीचा आचरण करणारा हा विचार आहे. नातीगोती आणि सर्व जाती धर्माच्या माणसांना आपल्या उराशी कवटाळून आपल्या सोबत नेणारा हा विचार म्हणजे माझे बाबा होय. बाबांनी दुष्काळ अनुभवला त्याच्या झळा त्यांनी सोसल्या निसर्ग माणसाला फार काही शिकवून जाते हे 72 च्या दुष्काळणं शिकवलं माझे वडील सांगत असे की ,आमची पिढी सडलेल्या गव्हांमुळे जगली ह्याच आत्मभान बाबांना होतं.नावाच्या मागेपुढे पदव्या लावून शहाणपणांचा टेंबा मिरवण्यापेक्षाही बाबा हे अस्सल शहाणपण घेऊन आलेले होते.

सतत निसर्ग वाचत राहणाऱ्या आणि कुठेस न थांबणाऱ्या कुळाचा हा विचार आहे.आई ही मायेचा सागर असते, पण बाप हा आयुष्याचा हिमालय असतो. बाप आपल्या लेकरांसाठी प्रत्येक वादळ झेलतो, संकटांचा भार खांद्यावर उचलतो आणि घराला उभं ठेवतो. परंतु दुर्दैव असे की, आपल्याला बापाची किंमत तो असताना कळत नाही, ते जाणवते तेव्हा तो नजरेआड झालेला असतो.माझे वडील मरहूम ताजुद्दीन महेबूब शेख हे असंच एक पर्वतरुपी व्यक्तिमत्व होतं. हिमालयाने ज्याच्या चरणाचे चुंबन घ्यावं याही पलीकडचं व त्याला शब्दांमध्ये मांडण कठीण आहे. माझ्या लहानपणापासून माझ्या दारात नेहमी खेटराची रास असायची. याचा अर्थ असा की माझ्या बाबांचा समृद्धीचा माणुसकीचा पट डोळ्यासमोर तरळतो ते या अर्थाने की त्यांनी नेहमी सर्व माणसांना जवळ केले. जीवन ही मजा आहे ती मनमुरादपणे जगावं, इतरांचे डोळे पुसावे हे जीवन जगण्याचे प्रयोजन असावं नाहीतर आयोजनाच्या भाणगडीत जीवन जगणं साह्य होऊन जाते. त्यामुळे आपण कशासाठी जगतो हेच कळत नाही. बाबा म्हणायचे मला पैशापेक्षा माणूस महत्त्वाचा आहे .माणसं जोडली ती सांभाळली हीच माझ्या जीवनाची कमाई आहे. त्यामुळे आपण माणसं जोडावे हा त्यांचा दृष्टिकोन होता.जातीभेदाच्या भिंती मोडून सर्व समाजाच्या माणसांना आपलेसे करणारे गावातल्या गोरगरिबांच्या लग्नकार्यापासून ते जयंती अशा प्रत्येक सामाजिक प्रसंग सहभागी घणारे, संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणारे ते खऱ्या अर्थाने माझे बाबा माणुसकीचे शिल्पकार होते.बाबा म्हणायचे आज लोकांचा भाकरीचा प्रश्न सुटलेला नाही.

लोक जिरवा जिरवीचं राजकारण करतात.समाज व्यवस्थेला लागलेले कीड म्हणजे जातिवाद या फंद्यात पडणे म्हणजे पापाचे धनी होणे. समाजाच्या व देशाच्या विकासात आडकाठी आहे माय,माती ,नाती आणि निती जपणं हे मला परिस्थितीने शिकवलं ,कारण बाबांची जीवनाची संघर्ष गाथा अंगावर शहरे आणणारी आहे. बाबांनी दगड फोडण्यापासून शेती दुग्ध व्यवसाय मजुरी ते मालक म्हणून जीवन जगले व त्या जगण्यात फारसा बदल न करता विनम्र वृत्तीने ,विनयशील,माणुसपण जपणार मानवतेचासे तू उभारणारं तसेच मानवी मनावर मशागत करणारे व्यक्तिमत्व म्हणजे माझे बाबा होय.

माझे बाबा, मरहूम शेख ताजुद्दीन महेबूब, हे आमच्या कुटुंबाचं बळ होते. त्यांच्या साध्या वागणुकीतही एक मोठेपणा होता. त्यांनी कधी शब्दांनी उपदेश दिला नाही, पण त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण हा आमच्यासाठी जिवंत धडा होता. प्रामाणिकपणा, कष्ट, नात्यांची जपणूक आणि माणुसकी—याच मूल्यांचा ठेवा त्यांनी आम्हाला दिला.आजही घरात अनेक क्षण असे येतात जेव्हा त्यांची आठवण श्वासासारखी जिवंत जाणवते. शांततेत बसताना त्यांच्या आवाजाची ऊब ऐकू येते, अडचणीत पडल्यावर त्यांचा आधार देणारा हात जाणवतो, आणि जीवनाच्या वळणावर त्यांचे शब्द कानात घुमतात. ते नाहीत, पण त्यांचा स्पर्श, त्यांचा सुगंध, त्यांची माणुसकी—हे सगळं अजूनही आमच्या भोवती आहे.त्यांनी फक्त संसार उभारला नाही, तर संपूर्ण कुटुंब एकत्र ठेवण्याचं विलक्षण सामर्थ्य दाखवलं. आई, आत्या, चुलते, भावंडं—हा सर्व गोतावळा त्यांनी गुण्यागोविंदाने एकत्र नेला. त्यांचं हसू, त्यांचं संयम, आणि प्रत्येकावर केलेलं प्रेम—यामुळे घराला एक वेगळीच ऊब मिळाली होती.बाबा अचानक निघून गेले हे सत्य अंगावर शहारे आणणारं आहे. त्यांच्या अनुपस्थितीची पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. पण या पोकळीतूनही त्यांच्या आठवणींचं बळ आमचं मार्गदर्शन करतं. खरं तर, त्यांनी दिलेला वारसा—माणुसकीचा, कष्टाचा, नात्यांच्या जपणुकीचा—हा आमच्या श्वासात मिसळलेला आहे.

आजच्या धावपळीच्या, यांत्रिक आयुष्यात आपण सर्व जण प्रगतीच्या शर्यतीत धावत आहोत. करिअर, पैसा, भौतिक सुखसोयी—यांच्या मागे पळताना आपण नकळत त्या माणसांना विसरत आहोत ज्यांच्या कष्टामुळे आज आपण उभे आहोत. ते म्हणजे आपले आई-वडील.आई ही मायेचा अथांग सागर आहे आणि वडील हा आयुष्याचा मजबूत आधारस्तंभ. बालपणी आपल्याला धरून चालायला शिकवणारे, अडचणींत आधार देणारे, स्वतःच्या इच्छा दाबून लेकरांच्या सुखासाठी आयुष्य वाहून घेणारे—हेच आई-वडील. त्यांचे उपकार आपण कधीही फेडू शकत नाही, हेच खरे.परंतु आजच्या समाजात एक विदारक चित्र दिसते—काही मुले आपल्या आई-वडिलांना ओझं मानू लागली आहेत. वृद्धावस्थेत ज्यांना आधाराची गरज आहे, त्यांनाच वृद्धाश्रमात ढकलले जात आहे. ही अवस्था केवळ दुर्दैवी नाही तर आपल्या संस्कृतीला काळिमा फासणारी आहे.ही आपली संस्कृती नव्हे तर संस्कृतीचं अंधानुकरण आहे.आपण हे विसरतो की आई-वडिलांची सेवा केली तर त्याचे आशीर्वाद आयुष्यभर आपल्या सोबत राहतात. त्यांचे आशीर्वाद हेच सर्वात मोठे पूंजी आहेत. पैसा, नोकरी, यश हे सगळं नश्वर आहे, पण आई-वडिलांचा दिलेला आशीर्वाद हेच खरं अमूल्य धन आहे.आई-वडिलांची ही विदारक अवस्था आज जे झालेली आहे हीआपली संस्कृती नाही, आपला धर्म नाही. आपल्या लेकरांनी वृद्धाश्रमाची वाट दाखवावी हा आपला वारसा नाही. उलट त्यांची सेवा, सन्मान आणि कृतज्ञतेने त्यांना सुख देणे हेच आपले कर्तव्य आहे.

मा के कदमो तले जन्नत है और बाप जन्नत का दरवाजा है.

आज त्यांच्या स्मृतींच्या या दिवशी त्यांना फक्त अश्रूंनी आठवणं नाही, तर त्यांच्या विचारांनी जगणं हीच खरी श्रद्धांजली आहे. बाप कधीच मरत नाही—तो आपल्या लेकरांच्या आठवणीतून, त्यांच्या श्वासातून आणि त्यांच्या मार्गक्रमणातून कायम जिवंत राहतो.तोरणघरी अन् मरणाघरी धावून जात असत. भूक बदलली की भूमिका बदलणाऱ्या आणि सरपटणाऱ्या माणसांच्या जगात तुमच्यासारखी माणसं शोधूनी सापडत नाही. तुमचा खांदा नेहमी गरजूंसाठी तत्पर असे आज पावलो पावली लोक खोटे बदलतात असं त्यांना सांगितलं ते म्हणायचे पाच बोटे सारखी नसतात. आपल्याला काय करायचे ते आपण ठरवावे वैर बाळगण्याची गोष्ट नसते वैर ठेवणे म्हणजे अहंकाराचे प्रतीक आहे. मानव हा माती पासून तयार झालेला आहे शेवटी त्याची माती होणार अहंकार फक्त शैतान करतो. तो मानवाचा गुण नाही माणूस तर दया व प्रेम करतो. त्यामुळे ते सर्वांना मायेच्या ममत्वाने पोटाशी कुर्वाळीत.संकुचित विचार त्यांच्या अवतीभवती फिरकत नव्हता. आपला खांदा जेवढा वजन पेळू शकतो तेवढी मदत बाबांनी नात्यातील लोकांना वेळोवेळी केली व इतर समाजांच्या लोकांनाही त्यांनी मदत केली. मग ते लग्न असेल, दवाखाना असेल व इतर सामाजिक सलोखा निर्माण करणारे कार्यक्रम असतील. सांगण्याचं तात्पर्य एवढंच की, ही सेवा माझ्याकडूनही घडो. हे लिहिण्यामागचा उद्देश एवढाच की प्रत्येकाने एकमेकाला सहकार्य करावे. बाबा नेहमी म्हणायचे हे मी करत नाही अल्लाह माझ्याकडून हे सर्व करवतो. सर्व समाजाची आत्मियता बाबांनी हयात भर जपली.कोणतेही कार्य दिखाऊ न करता टिकाऊ केले. बाबांना जगाला निरोप देऊन आज १९ वर्षे पूर्ण झाली असली तरी आजही त्यांच्या आठवणी जिवंत आहे. लोक आजही त्यांचं नाव घेतात असा माणूस आम्ही कधी पाहिला ना पाहणार! आपण नेहमी म्हणत असतो कुठलाही मुलगा जर डोळे झाकून एखाद्या पुरुषावर विश्वास ठेवू शकतो तर तो फक्त त्याच्या बापावर परंतु माझ्या बापाच्या संदर्भाचे हे विधान फेल ठरतो, कारण माझ्या बापावर सर्व लोक डोळे झाकून विश्वास करत. आयुष्यात त्यांनी कोणालाही फायदाच पाहचवला बाबांच्या सामाजिक कार्याचा आवाका अफाट आहे. ते एका लेखात मांडण शक्य नाही म्हणून असे म्हणावा असे वाटते की,

**फुल खुशबू हवा हो गये या रब**
**वो भले लोग कहा गये या रब**



डॉ.शेख आरिफ ताजुद्दीन
मो. ७०२०२६८४७१